# सेंद्रीय शेती कार्यशाळा

माळढोक संवर्धन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जैवविविधता मंडळ नागपुर यांच्या मार्गदर्शनाखाली महारोगी सेवा समिती वरोरा व्दारा संचालित आनंद निकेतन कृषि महाविद्यालय तथा आनंदवन कृषि तंत्र निकेतनच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ सप्टेंबर २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता एक दिवसीय सेंद्रिय शेती कार्यशाळेचे आयोजन कृषि तंत्र निकेतनच्या सभागृहात करण्यात आले होते. उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाची सुरवात सरस्वती पुजन तथा दिप प्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे सचिव डॉ. विकास आमटे यांनी स्वीकारले. त्यानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सुहास पोतदार यांनी केले. प्रास्ताविकात प्राचार्य सुहास पोतदार यांनी सेंद्रीय गट शेतीची संकल्पना व्यक्त केली. त्या गटाला महाविद्यालयाकडुन सर्व प्रकारची तांत्रिक मदत करण्याकरिता तसेच सेंद्रीय उत्पादनाला बाजारपेठ मिळवुन देण्याकरिता आश्वस्त केले. प्रमुख पाहुणे म्हणुन बोलतांना संस्थेचे विश्वस्त श्री गौतम करजगी यांनी शेतीच्या काटेकोर नियोजनाबद्दल तसेच आर्थिक शिस्ती बद्दल विचार मांडले. प्रसंगी ॲड. डॉ. एन. डी. चौधरी कायदेशीर सल्लागार महाराष्ट्र जैवविविधता मंडळ नागपुर यांनी माळढोक संवर्धनाकरिता तसेच शेतकरी आत्महत्तेवरील उपाय म्हणुन सेंद्रीय शेती चे महत्व विशद केले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलतांना डॉ. विकास आमटे यांनी मानवाच्या विरोधाभासी कृतीबद्दल चिंता व्यक्त केली तथा जैवविविधता टिकविण्याकरिता आपण सारे प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. तसेच आनंदवनातील शेतीचे प्रयोग हे शेतकऱ्यांकरिता मार्गदर्शक आहेत तेव्हा त्याचा फायदा शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन डॉ. विकास आमटे यांनी सेंद्रिय शेती कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी केले. या उद्घाटनाच्या कार्यक्रमाच्या शेवटी पाहुण्यांप्रती प्रा. अतुल काकडे यांनी आभार व्यक्त केले.

उद्घाटनानंतरच्या प्रथम सत्रांमध्ये सेंद्रिय शेतीची ओळख तथा करावयाची कामे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन महाविद्यालयाचे विषयतज्ञ प्रा. एम. व्ही. पुसदेकर यांनी केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात शेतकऱ्यांच्या शंकाचे समाधान करीत डॉ. मनोज जोगी

यांनी सेंद्रिय शेतीतील रोग व खत व्यवस्थापनाबद्दल शेतकऱ्यांसोबत चर्चा केली. त्यानंतर भोजन अवकाशामध्ये शेतकऱ्यांनी भोजनाचा आस्वाद घेतला. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात चित्रफितीच्या सहाय्याने डॉ. प्रमोद मगर यांनी रासायनिक घटकाशिवाय कीड व्यवस्थापन या विषयावर शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. दुपारच्या चहा नंतर प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. भेटी दरम्यान शेतकऱ्यांना गांडूळ खत प्रकल्प दाखविण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयाच्या सेंद्रिय शेतीचे शिवार फेरी करण्यात आली. प्रक्षेत्र भेटी दरम्यान शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान विषयतज्ञांव्दारे करण्यात आले. सदर कार्यशाळेचा समारोप प्रक्षेत्रावरच करण्यात आला प्रसंगी प्राचार्य श्री सुहास पोतदार यांनी शेतकऱ्यांना महाविद्यालयाच्या सोयी सुविधांचा लाभ घेण्याचे तसेच भविष्यात महाविद्यालयासोबत संपर्क ठेवण्याचे आवाहन केले. कार्यशाळेचे सुत्र संचालन प्रा. राहुल तायडे यांनी केले. कार्यशाळेचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.